अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.१३ जानेवारी २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १०८ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## केएल राहुलची यशस्वी झुंज, श्रीलंकेविरुद्ध भारताचा मालिका विजय

✔ **कोलकाता** : भारत आणि श्रीलंका यांच्यात कोलकात्याच्या ईडन गार्डन्स पार पडलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारत ४ गडी राखून विजय मिळवण्यात यशस्वी झाला आहे. नाणेफेक जिंकत श्रीलंका संघाने प्रथम फलंदाजी निवडल्यानंतर २१५ धावा करत २१६ धावांचं माफक लक्ष्य भारताला दिलं. पण ते करतानाही भारताची वरची फळी स्वस्तात बाद झाल्याने सामना काहीसा रंगतदार झाला. अखेर राहुलच्या संयमी अर्धशतकाने सामना भारताने जिंकला.

पांड्यानेही राहुलला चांगली साथ दिली. ज्यामुळे भारताने ६ गडी गमावत ४३.२ षटकात निर्धारीत लक्ष्य पूर्ण केले. तीन वन-डे सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना जिंकलेल्या भारताने आजही विजय मिळवत मालिकाही २-० च्या विजयी आघाडीने नावे केली आहे. सामन्यात सर्वप्रथम नाणेफेक जिंकत श्रीलंका संघाने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामना होणाऱ्या ईडन गार्डन्सची खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल असल्याने प्रथम फलंदाजी करत एक मोठं लक्ष्य भारतासमोर ठेवण्याचा श्रीलंका संघाचा डाव होता. श्रीलंकेकडून पदार्पण करणाऱ्या एन. फर्नांडो याने अर्धशतक झळकावलं. याशिवाय कुसल मेंडीसनेही ३४ धावा केल्या. भारताकडून सर्वच गोलंदाजांनी उत्तम ओव्हर्स टाकल्या. कुलदीप यादवने ३ विकेट्स घेतल्या. तर मोहम्मद सिराजने अवघ्या ५.३ षटकांत ३० धावा देत ३ विकेट्स घेत सर्वोत्तम गोलंदाजी केली.

## ५ तालुके 

## ६५ हजार शेतकरी 

## ११० कोटींची मदत 

✔ सुराज्य/सोलापूर

**गेल्या ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टीने बाधित झालेल्या जिल्ह्यातील पाच तालुक्यांमधील तबल ६५ हजार शेतकऱ्यांना राज्य शासनाने दिलासा दिला असून फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत चक्क ११० कोटी रुपयांची मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वर्ग केली जाणार आहे. जिल्हा प्रशासनाने जेवढी मदत मागितली होती; तेवढी मदत शासनाने दिली असून ही मदत पंतप्रधान किसान योजनेच्या धर्तीवर पहिल्यांदाच राज्य शासनाकडून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतनिधी जमा होणार आहे.**

# ऑक्टोबरमध्ये अतिवृष्टीची बाधा; फेब्रुवारीत होणार मदत अदा

### एकूण बाधित क्षेत्र

- दक्षिण सोलापूर - ५ हजार ३३४ हेक्टर
- माढा - २१ हजार ७५३ हेक्टर
- करमाळा -१६ हजार ८१३ हेक्टर
- मंगळवेढा - १ हजार ११८ हेक्टर
- सांगोला : ३ हजार ७३४ हेक्टर

### तालुका निहाय बाधित शेतकरी

- दक्षिण सोलापूर ५ हजार ३१३)
- माढा (२६ हजार ७१०)
- करमाळा (२२ हजार ८७१)
- मंगळवेढा (२ हजार ६७९)
- सांगोला (७ हजार ५९३)

### अशी मिळणार नुकसान भरपाई

- दक्षिण सोलापूर : ९ कोटी ६ लाख ९८ हजार ६८० रुपये
- माढा : ५५ कोटी २९ लाख १३ हजार ७०० रुपये
- करमाळा : ३ कोटी ४० लाख ६६ हजार २८८ रुपये
- मंगळवेढा :१ कोटी ९१ लाख १८ हजार ५२ रुपये
- सांगोला : १० कोटी २२ लाख ५० हजार ६६० रुपये

### ग्रामपंचायतीमध्ये याद्या प्रसिध्द करणार

बाधित पाच तालुक्यातील लाभधारक शेतकऱ्यांची यादी ज्या त्या गावच्या ग्रामपंचायतीमध्ये प्रसिध्द केली जाईल. संबंधित शेतकऱ्यांनी यादीत आपले नाव पाहून त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक करावे. त्यानंतर नुकसानभरपाईची रक्कम शासनाकडून थेट खात्यावर जमा होणार आहे.



गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर, माढा, करमाळा, मंगळवेढा, सांगोला या पाच तालुक्यांमध्ये मोठी अतिवृष्टी झाली होती. त्यात या तालुक्यातील ६५ हजार १६६ शेतकऱ्यांच्या ४८ हजार ७५४ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन, भुईमूग, उडीद, मका, बाजरीसह फळपिके व फळबागांचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड मोठा फटका बसला होता. त्यानंतर नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले होते. त्यानुसार महसूल आणि कृषी विभागाने पंचनाम्याचे काम पूर्ण करून जिल्हा प्रशासनाच्यावतीने शासनाकडे मदतीचा अहवाल पाठविला होता. हिवाळी अधिवेशनात शासनाने सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना भरपाई देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दि. ११ जानेवारी रोजी त्याबाबतचा शासन निर्णयही जाहीर झाला आहे. त्यानुसार आता जिल्ह्यातील पाच तालुक्यातील अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना ११० कोटी ५६ लाख ४ हजार ३९७ रुपयांची रक्कम मिळणार आहे.

## जेडीयूचे माजी अध्यक्ष शरद यादव यांचे निधन



✔ नवी दिल्ली : माजी केंद्रीय मंत्री शरद यादव यांचे निधन झाले आहे. ७५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. शरद यादव यांच्या मुलीनं ट्वीट करत याबाबतची माहिती दिली. पापा नहीं रहे, असं ट्वीट शरद यादव यांच्या मुलीनं केलं आहे. गुरुग्राम येथील फोर्टिस रुग्णालयात शरद यादव यांनी अखेरचा श्वास घेतला. विद्यार्थी असताना राजकारणापासून सुरु झालेला शरद यादव यांचा प्रवास राष्ट्रीय राजकारणापर्यंत पोहचला. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये शरद यादव यांनी राजकीय प्रवास केला. जेडीयूचे ते राष्ट्रीय अध्यक्ष राहिलेत. शरद यादव यांनी सात वेळा खासदार म्हणून काम पाहिले आहे.

## उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यामुळे थंडीचा कडाका वाढणार

✔ **सोलापूर** : उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रवाहांमुळे महाराष्ट्राच्या तापमानात घट होऊन सर्वत्र थंडी अवतरली आहे. हिमालयीन विभागात पुन्हा बर्फवृष्टी होणार असल्याने संक्रांतीपर्यंत रात्रीच्या किमान तापमानात आणखी घट होऊन थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता आहे.

सध्या उत्तर-पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील रात्रीच्या किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत मोठी घट कायम असल्याने या भागात थंडीचा कडाका आहे. मुंबईसह कोकण आणि किनारपट्टीच्या भागातही तापमानात घट होऊन गारवा निर्माण झाला आहे. एकापाठोपाठ निर्माण होणाऱ्या पश्चिमी चक्रवाताचा परिणाम म्हणून हिमालयीन विभागातील बर्फवृष्टी आणि उत्तरेकडील राज्यांतून महाराष्ट्राकडे येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रवाहांमुळे गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या तापमानात मोठी घट झाली. ९ आणि १० जानेवारीला मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही भागांत थंडीच्या लाटेची स्थिती होती. गोंदिया, नाशिक, औरंगाबाद, नागपूर आदी भागांत ५ ते ६ अंश हंगामातील नीचांकी किमान तापमानाची नोंद झाली. सध्या तापमानात किंचित वाढ झाली असली, तरी सर्व ठिकाणी तापमान सरासरीखालीच आहे. त्यामुळे गारवा कायम आहे.



थंड वाऱ्यांच्या प्रवाहांमुळे सध्या कर्नाटकातही थंडीच्या लाटेची स्थिती निर्माण झाली आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये पुन्हा पश्चिमी चक्रवाताचा परिणाम दिसणार आहे. जम्मू-काश्मीर, लडाख हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आदी भागांत १२ आणि १३ जानेवारीला बर्फवृष्टी आणि पावसाची शक्यता आहे.



## पाईपलाईन फुटली

✔ सुराज्य/टेंभूर्णी

टेंभुर्णी शहरातून जाणाऱ्या सोलापूर- पुणे जुन्या महामार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम करताना पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनला पोकलॅनचा धक्का लागल्याने पाईपलाईन फुटली. सुमारे सत्तर ते नव्वद फुटांपर्यंत पाण्याचा फवारा कारंजा प्रमाणे उडत असून हजारो लीटर पाणी वाया जात आहे. मोबाईलमध्ये पाण्याचा उडणाऱ्या फवाऱ्याचे फोटो व शुटींग काढण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली.

टेंभुर्णी शहरातून जाणाऱ्या सोलापूर -पुणे जुन्या महामार्गाच्या सुमारे सहा किलोमीटर अंतराच्या काँक्रीटीकरणाचे काम सध्या सुरू असून अनेक ठिकाणी पोकलेनच्या खोदण्यात येत आहे.पाईपलाईनला धक्का लागल्याने पाईपलाईन फुटली त्यामुळे प्रचंड वेगाने सत्तर ते नव्वद फुटांपर्यंत पाण्याचा फवारा हवेत उडण्यास सुरुवात झाली. पाईपलाईनमधून हजारो लीटर पाणी वाया गेले. दरम्यान सोलापूर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाशी संपर्क साधून टेंभुर्णीत पाईपलाईन फुटल्याची माहिती दिली असता सोलापूर पाणी पुरवठा योजनेच्या मोटारी बंद करण्यात आल्या. तेंव्हा ही पाईपलाईन उस्मानाबाद शहरास पाणी पुरवठा करणारी असल्याचे समजले.

### सीसीएच ॲपच्या माध्यमातून फसवणूक

## चर्चा १०० कोटींची; तक्रारी मात्र ७६ लाखांच्याच

### फसलेल्या गुंतवणूकदारांनी तक्रारी देण्याचे आवाहन

✔ सुराज्य/सोलापूर





सीसीएच ॲप माध्यमातून गुंतवणूक करण्यास सांगून अनेकांची फसवणूक केल्याप्रकरणी अनंत येरंकल्लू व जयंत येरंकल्लू स्मिता येरंकल्लू पैकी अनंत आणि जयंत येरंकल्लूया बंधूंना अटक केली आहे.दि.१७ जानेवारी पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे.मात्र ज्यांची या प्रकरणात फसवणूक झाली असून ज्यांनी अद्याप तक्रारी दिल्या नाहीत अशांनी पुढे येऊन तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहन आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनी केले आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाकडे आतापर्यंत ७३ फिर्यादीने तक्रारी दाखल केलेल्या आहेत. फसवणुकीची रक्कम ही ७६ लाखापर्यंत पोहोचली आहे. सुरुवातीच्या काळात ही रक्कम १०० कोटी ५०० व १ हजार कोटी एवढी फसवणूक झाल्याचे बोलले जात होते. परंतु प्रत्यक्षात आजपर्यंत ७६ लाखांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ज्यांची या प्रकरणात फसवणूक झाली आहे.त्यांनी निर्भयपणे पुढे येऊन तक्रारी दाखल करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

दरम्यान याबाबत १२ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून पोलीस तिन्ही आरोपींच्या शोधात होते. यातील अनंत व जयंत येरंकल्लू यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन महिन्यांनी मंगळवारी अटक केली. या दोन महिन्याच्या कालावधीत आरोपींनी अनेक ठिकाणी जाऊन देवदर्शन उरकले.आर्थिक गुन्हे शाखेने गुरुवारी दिवसभर त्याच्या घराची व दुकानाची झडती घेतली.या झडतीत अनेक कागदपत्रे महत्त्वाचे दस्तऐवज आढळले आहे.या प्रकरणातील अजून एक महिला आरोपी फरार आहे. तिचाही शोध चालू आहे.या पाच-सहा दिवसात अनेक महत्त्वाचे दस्तऐवज हाती लागतील असेही बहिरट यांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पक्षी बदला,
भाग्य बदलेल!

कल्याण
690-57-124

मेन बाजार
339-53-490

### स्मार्ट सिटीची आज आढावा बैठक

## समांतर जलवाहिनीबाबत पालकमंत्र्यांच्या भूमिकेकडे लक्ष

✔ **सोलापूर** : सोलापूर स्मार्ट सिटीची बैठक शुक्रवारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. शहराची जीवनदायिनी मानल्या जाणाऱ्या उजनी- सोलापूर समांतर जलवाहिनीचे अचानक थांबवलेले काम पुन्हा सुरू करणे तसेच स्मार्ट सिटीच्या विविध कामातील अनियमिततेबाबत कारवाई संदर्भात पालकमंत्री काय निर्णायक भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पालकमंत्र्यांच्या या दौऱ्यात समांतर जलवाहिनीचे काम पुन्हा सुरू होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**हे आहेत प्रलंबित विषय :** उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनीचे अचानक थांबविलेले काम सुरू करणे, स्मार्ट सिटी योजनेंतर्गत झालेल्या कामातील अनिमितीतेची चौकशी करणे, समांतर जलवाहिनी साठी आणखी आवश्यक असलेला ३८० कोटीच्या निधी मागणीचा शासनाकडील प्रस्तावाबाबत पाठपुरावा, अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईन संदर्भातील शासनाकडील प्रस्तावाबाबत पाठपुरावा.

उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम तत्कालीन सीईओ त्रिंबक ढेंगळे पाटील यांनी अचानकपणे काम थांबविण्याचे आदेश २४ नोव्हेंबर २०२२ रोजी दिले. त्यामुळे पाणीपुरवठा संदर्भातल्या या महत्त्वपूर्ण योजनेला पुन्हा ब्रेक लागला. थांबवलेले काम सुरू करण्यासंदर्भात आदेश देण्यासाठी स्मार्ट सिटीचे चेअरमन असीम गुप्ता यांनीही तत्परता दाखविली नाही. या विषयासंदर्भात दीड महिने उलटले तरी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण

पाटील यांची नेमकी भूमिका काय या संदर्भात प्रश्न उपस्थित होत आहे. विधानसभेच्या नागपूर अधिवेशनात आमदार प्रणिती शिंदे यांनी याकडे लक्ष वेधले मात्र त्यानंतरही पालकमंत्र्यांनी या संदर्भात नेमके काय आदेश दिले? काय निर्णय घेतला? काय भूमिका घेतली? असा सवाल सोलापूरकरांमधून उपस्थित झाला. उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम थांबविल्या प्रकरणी तत्कालीन सीईओ त्र्यंबक ढेंगळे पाटील आणि स्मार्ट सिटी चे चेअरमन असीम गुप्ता यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी सोलापुरात माजी महापौर एरिया यांनी आंदोलन केले. याप्रकरणी कारवाईची मागणी जोर धरत आहे. या समांतर जलवाहिनीच्या कामाला मुहूर्त कधी लागणार, तत्कालीन सीईओंनी सध्याच्या लक्ष्मी कंपनीचे काम का थांबवले? स्मार्ट सिटी बोर्डाच्या बैठकीमध्ये चेअरमन असीम गुप्ता यांनी इतिवृत्तास मान्यता देऊन थांबवलेले काम सुरू करण्याचे पुन्हा आदेश का दिले नाहीत? या कामामध्ये पुन्हा पोचमपाड कंपनीला आणण्यामागे गौडबंगाल काय असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. शुक्रवारी होणाऱ्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गांभीर्याने या विषयाकडे लक्ष देत हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी होत आहे.